॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


**दु:खाचे ज्ञान होणे ही दु:खावर मात करण्याची पहिली महत्त्वाची पायरी असते.**

**- गौतम बुद्ध**







अहिल्यानगर | मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४ | वर्ष ५ वे | अंक २३० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145




**सिरप व बी-हेवी मोलासेस पासून इथेनॉल निर्मिती करणार**

पान क्र. २ वर



**संगमनेर दूध संघास खाजगी दूध संकलन केंद्रांचा दूध पुरवठा**

पान क्र. ३ वर



**संविधानाचा रंग बदलणारे संविधानाचे रक्षण करू शकत नाहीत**

पान क्र. ४ वर

# गिधाडांसह देशात विविध पक्ष्यांच्या संख्येत मोठी घट!

## लिव्हिंग प्लॅनेट अहवाल २०२४ मधून माहिती समोर

**● मुंबई । वीरभूमी –**
गेल्या ५० वर्षांत देशातील गिधाडांसह अन्य जातींच्या पक्ष्यांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. १९९२ ते २०२२ या काळात पांढऱ्या रंगाच्या गिधाडांची संख्या ९८ टक्क्यांनी आणि भारतीय गिधाडांसह सडपातळ गिधाडांची संख्या ९३ टक्क्यांनी कमी झाली आहे, अशी धक्कादायक माहिती लिव्हिंग प्लॅनेट अहवाल २०२४ मधून समोर आली आहे.

देशातील विविध जातींच्या पक्ष्यांची संख्या वेगाने कमी होत आहे. या अहवालात भारतातील पक्ष्यांची स्थिती आणि संख्येविषयी वेगळा विभाग करण्यात आला. लिव्हिंग प्लॅनेट अहवाल २०२४ मधील माहितीनुसार १९८० च्या तुलनेत २०२४ मध्ये देशातील पक्ष्यांच्या संख्येत वेगाने घट होत आहे. प्रामुख्याने जनावरांवर उपचार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या डायक्लोफेनाक, एसेक्लोफेनाक, केटोपोर्फेन आणि नाइमसुलाइड औषधांमुळे गिधाडांच्या संख्येत घट होत आहे.

पशुवैद्यक आणि पशुपालकांमध्ये या औषधांबाबत व्यापक जागृती करूनही गिधाडांचा ऱ्हास रोखता आला नसल्याचेही या निमित्ताने समोर आले आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या उच्च दाबाच्या वीज वाहक तारांच्या जाळ्याचाही विपरीत परिणाम होताना दिसत आहे. विजेचा धक्का लागून अनेक पक्ष्यांना जीव गमवावा लागत आहे.



लिव्हिंग प्लॅनेट अहवाल २०१६ नुसार जगातील २२ देशांमध्ये गवताळ कुरणांचा ऱ्हास झाल्यामुळे फुलपाखरांच्या एकूण प्रजातींपैकी ३३ टक्के प्रजातींमध्ये घट झाल्याचे दिसून आले आहे. ओडिशातील मधमाश्यांच्या संख्येत ८० टक्क्यांनी घट झाली आहे. पर्यावरणाचा वेगाने ऱ्हास होत असल्याचा थेट परिणाम पक्ष्यांच्या संख्येवर दिसून येत आहे. देशांतील पक्ष्यांच्या संख्येत घट झाली आहेच. त्या शिवाय देशात येणाऱ्या स्थलांतरीत पक्ष्यांच्या संख्येतही घट दिसून येत आहे. पक्ष्यांच्या संख्येतील घट हे गभीर संकट म्हणून समोर आले आहे. तातडीने एकात्मिक उपाययोजनांची गरज आहे, असे मत इला फाउंडेशनचे संचालक, पक्षीतज्ज्ञ डॉ. सतीश पांडे यांनी व्यक्त केले.

पशुधनाच्या उपचारासाठी वापरली जाणारी औषधी गिधाडांसाठी अत्यंत घातक असून, या औषधांमुळे गिधाडांसह विविध पक्ष्यांच्या जाती नष्ट होत आहेत. याशिवाय उच्च दाबाच्या वीज वाहिन्यांच्या धक्क्यामुळेही पक्ष्यांची जीवित हानी मोठी प्रमाणात होते. गवताळ कुरणे, पाणथळ ठिकाणे, जंगले कमी झाल्यामुळे पक्षी, जंगली जनावरांच्या नैसर्गिक अधिवासाचा ऱ्हास झाला आहे. तसेच ओडिशामध्ये याच कारणामुळे २००२ पासून मधमाश्यांच्या संख्येत ८० टक्के घट घट झाली आहे. एकूणच पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे जैवविविधता नष्ट होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### नैसर्गिक आधिवासाच्या ऱ्हासाचा बसतोय फटका

■ वाढते शहरीकरण, नागरीकरण आणि शेतीसाठी गवताळ कुरणे, झुडपांची कुरणे, जंगले आणि पाणथळ जांगाचा ऱ्हास होत असल्याने पक्ष्यांच्या नैसर्गिक आधिवासाचा ऱ्हास होत आहे.

### प्रमुख भक्ष्य असलेल्या किटकांच्या संख्येत घट

■ देशातील बहुपीक पद्धतीचा वेगाने ऱ्हास होत आहे. नगदी पिकांची लागवड वाढली आहे. त्यामुळे पक्ष्यांचे भक्ष्य असलेल्या किटकांची संख्या वेगाने कमी होत आहे. खाद्यांचा अभाव हेही पक्ष्याची संख्या वेगाने कमी होण्याचे किंवा पक्ष्यांनी स्थलांतर करण्याचे प्रमुख कारण आहे.

## SPOT NEWS

### राहुल गांधी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

**● मुंबई –** लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी मंगळवार दि. १२ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून उद्या ते बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे काँग्रेस उमेदवार राहुल बोंद्रे आणि खामगावचे उमेदवार राणा दिलीप सानंदा यांच्यासाठी आणि गोंदिंया येथे काँग्रेसचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांच्यासाठी दोन प्रचारसभा घेणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराने आता वेग घेतला असून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या प्रचार सभाही राज्याच्या विविध भागात आयोजित करण्यात आल्या आहेत. याआधी ६ नोव्हेंबर रोजी राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात येऊन नागपूर येथे संविधान संमेलनाला संबोधित केले होते व त्यानंतर संध्याकाळी वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथील प्रचारसभेत महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीच्या ५ गॅरंटी जाहीर केल्या होत्या.

### मणिपुरात पोलिस ठाण्यावर हल्ला करणारे ११ अतिरेकी ठार

**● नवी दिल्ली –** मणिपूरमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलाने मोठी कारवाई केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मणिपूरच्या जिरीबाममध्ये झालेल्या चकमकीत सीआरपीएफने ११ अतिरेक्यांचा खात्मा केला आहे. या चकमकीत सीआरपीएफचा दोन जवान जखमी झाल्याचीही माहिती आहे. सीआरपीएफच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी सीआरपीएफच्या पथकावर हल्ला केल्यानंतर ही चकमक सुरु झाली होती. या चकमकीत आतापर्यंत ११ कुकी अतिरेकी ठार झाले आहेत. सोमवारी मणिपूरमधील जिरीबाममध्ये सुरक्षा दल आणि कुकी अतिरेक्यांमध्ये जोरदार चकमक झाली. सुरक्षा दलाने केलेल्या गोळीबारात किमान ११ संशयित कुकी अतिरेकी ठार झाले आहेत. आसामच्या सीमेला लागून असलेल्या जिरीबाम जिल्ह्यात संशयित कुकी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाचे दोन कर्मचारी जखमी झाले आहेत. जिरीबाम जिल्ह्यातील बोरोबेकरा पोलिस ठाण्यावर आज दुपारी अडीच वाजता संशयित अतिरेक्यांनी हल्ला केला होता. अतिरेक्यांच्या बाजूने सीआरपीएफच्या पथकावर मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. त्यानंतर सीआरपीएफच्या जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.

# काँग्रेसच्या २८ बंडखोरांचे निलंबन

**● मुंबई । वीरभूमी–**
काँग्रेस तसेच महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढविणा-या २८ बंडखोरांवर काँग्रेसने निलंबनाची कारवाई केली आहे. या सर्वांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाची कारवाई झालेल्या बंडखोरांमध्ये माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, माजी आमदार सुरेश जेथलिया, आनंदराव गेडाम, विजय खडसे आदींचा समावेश आहे.

काँग्रेस महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत जागावाटप झाल्याने काँग्रेसच्या अनेक इच्छुकांचा हिरमोड झाला. त्यामुळे संतप्त झालेल्या काँग्रेसच्या इच्छुकांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत बंडखोरी केली आहे. महाविकास आघाडीच्या धर्मानुसार काँग्रेसने या बंडखोरांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

त्यानुसार शामकांत सनेर (शिंदखेडा), राजेंद्र ठाकूर (श्रीवर्धन), आबा बागुल (पर्वती), मनीष आनंद (शिवाजीनगर) सुरेश जेथलिया, कल्याण बोराडे (परतूर), राजेंद्र मुळक, चंद्रपाल चौकसे (रामटेक), आनंदराव गेडाम, शिलू चिमूरकर (आरमोरी), सोनल कोवे, भरत येरमे (गडचिरोली), अभिलाषा गावतुरे, राजू झोडे (बल्लारपूर), प्रेमसागर गणवीर (भंडारा), विलास पाटील, आसमा जव्वाद चिखलेकर (भिवंडी), अजय लांजेवार (अर्जुनी मोरगाव), हंसकुमार पांडे (मीरा-भाईंदर), कमल व्यवहारे (कसबा पेठ), मोहनराव दांडेकर (पलूस-कडेगाव), अहमदनगर शहर (मंगल विलास भुजबळ), मनोज शिंदे, सुरेश खेडे पाटील (कोपरी पाचपाखाडी), विजय खडसे (उमरेड), शबीर खान (यवतमाळ), अविनाश लाड (राजापूर), याज्ञवल्क्य जिचकार (काटोल) यांना काँग्रेसने सहा वर्षासाठी बाहेरचा रस्ता दाखवला आहे.

# देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्या. संजीव खन्नांनी स्वीकारला पदभार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**
भारताचे माजी सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांचा कालावधी १० नोव्हेंबर २०२४ रोजी संपला. त्यानंतर आज भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्या. संजीव खन्ना यांनी शपथ घेतली. चंद्रचूड यांच्यानंतर संजीव खन्ना हे सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यांच्या काळात त्यांनी काही ऐतिहासिक आणि महत्त्वाचे निकाल घेतले आहेत.



सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ आजपासून सुरू झाला असला तरी त्यांना धनंजय चंद्रचूड यांच्याप्रमाणे दोन वर्षे मिळणार नसून फक्त सहा महिनेच त्यांना या पदावर राहता येणार आहे. १३ मे २०२५ हा संजीव खन्ना यांच्या सेवेचा शेवटचा दिवस असणार आहे. त्या दिवशी ते निवृत्त होणार असल्याने सरन्यायाधीश म्हणूनदेखील त्यांना फक्त १३ मे पर्यंतच पदावर राहता येणार आहे. परिणामी त्यांना ६ महिनेच या पदावर राहता येणार आहे.

संजीव खन्ना यांचा जन्म १४ मे १९६० रोजी झाला असून सुमारे चार दशकाहून अधिक काळ ते न्यायिक क्षेत्रात काम करत आहेत. १९८३ साली दिल्ली बार कौन्सिलचे सदस्य झाल्यानंतर त्यांनी जिल्हा न्यायालय तीस हजारी कोर्ट नंतर दिल्ली उच्च न्यायालय आणि विविध लवादांमध्ये वकिली केली. घटनात्मक कायदा, कर आकारणी, विविध लवाद, व्यावसायिक कायदे, कंपनी कायदे आणि पर्यावरण कायदे यासारख्या कायद्याच्या अनेक क्षेत्रात त्यांनी यशस्वीरित्या वकिली केली.

# कार्तिकीला आज पंढरपुरात वैष्णवांचा मेळा

## शासकीय पूजेचा मान विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांना

**● पंढरपूर। वीरभूमी –**
कार्तिक शुद्ध प्रबोधनी एकादशीदिनी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे वैष्णवांचा मेळा भरणार आहे. या यात्रेसाठी २ लाखांहून अधिक भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत.

यंदा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने मंगळवारी पहाटे २.२० वाजता श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या शासकीय महापूजेचा मान सरकारचे प्रतिनिधी म्हणून डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे व मानाचे वारकरी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

दरवर्षी कार्तिक यात्रेतील शासकीय महापूजेचा मान उपमुख्यमंत्र्यांना असतो. मात्र, यंदा आचारसंहिता असल्याने उपमुख्यमंत्र्यांऐवजी महापूजेचा मान विभागीय आयुक्तांना मिळाला असल्याचे मंदिर समितीने सांगितले. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने पंढरपुरात भाविकांची गर्दी वाढत आहे. पालख्यांचे आगमन होत आहे. वारकरी मोठ्या संख्येने दिसून येत आहेत. पंढरपूर शहरात गर्दी वाढत असून विठ्ठलाच्या दर्शनासाठी रांगा लागल्या आहेत.

शासकीय महापूजेपूर्वी मंदिर समितीमार्फत होणारी श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेची पाद्यपूजा व नित्यपूजा अनुक्रमे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते संपन्न होत असून, शासकीय महापूजेसाठी प्रशासकीय अधिकारी व पौरोहित्य करणारे कर्मचारी उपस्थित राहणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

या वारीत पोलीस प्रशासनाने कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे. सुरक्षा व वाहतूक नियंत्रणासाठी १,६२६ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून जड वाहतूक शहराबाहेरून वळविण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण येथे तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.



SPOT NEWS

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर झालेल्या हल्ल्याचा निषेध

### जशास तसे उत्तर देण्याचा वंचित बहुजन आघाडीचा इशारा

● **नगर । वीरभूमी –**

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर नांदेड मध्ये झालेल्या हल्ल्याचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीत एक जातीय घराणेशाहीला आव्हान देणाऱ्यांवर अशा प्रकारे हिंसक व भ्याड हल्ले करुन त्यांना रोखण्याचा प्रयत्न होत असेल, तर वंचित बहुजन आघाडी हे कदापि सहन करणार नाही. या प्रवृत्तींना जशास तसे उत्तर देण्याचा इशारा वंचितचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे व सल्लागार जे.डी. शिरसाठ यांनी दिला आहे. नांदेड जिल्ह्यात प्रचारासाठी दौऱ्यावर असताना हाके यांच्या वाहनावर हल्ला करण्यात आला. सर्वसामान्य ओबीसी बांधवांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी आणि एस.सी., एस.टी., ओबीसींचे आरक्षण वाचवण्यासाठी वंचित बहुजन आघाडी कटिबद्ध आहे. प्रस्थापित मराठा नेतृत्वाच्या घराणेशाहीच्या सत्तेला आव्हान निर्माण झाल्याने ओबीसी नेत्यांवर हल्ले केले जात आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीने आपल्या हस्तकांच्या माध्यमातून लक्ष्मण हाके यांच्यावर हल्ला केला असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे.असे हल्ले घडवून राज्यात दहशतीचे वातावरण निर्माण केले जात आहे. वंचित बहुजन आघाडी ही दहशत बिलकुल खपून घेणार नाही. पुन्हा असे भ्याड हल्ले झाल्यास जशास तसे उत्तर दिले जाणार आहे. तर हल्ल्यामागील मास्टर माईंड नेत्यांना जिल्ह्यात फिरू देणार नसल्याचे प्रसिध्दीपत्रकात म्हंटले आहे.

# सिरप व बी-हेवी मोलासेस पासून इथेनॉल निर्मिती करणार

## नरेंद्र घुले पाटील । लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर साखर कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ

● **नेवासा । वीरभूमी–**

या हंगामात १२.५ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट असून सिरप व बी-हेवी मोलासे पासून २.५ (अडीच) कोटी लिटर इथेनॉलची निर्मिती करणार असल्याची माहिती लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी दिली.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे ५१ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ सोमवार दि.११ नोव्हेंबर रोजी कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे हस्ते पहिली ऊस मोळी टाकून करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, ज्येष्ठ संचालक ॲड.देसाई देशमुख, काकासाहेब नरवडे, काशीनाथ नवले, काकासाहेब शिंदे, अशोकराव मिसाळ, प्रा. नारायण म्हस्के, भाऊसाहेब कांगुणे, जनार्धन कदम, शिवाजी कोलते, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, दीपक नन्नवरे, शंकरराव पावसे, विष्णू जगदाळे, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, सचिव रवींद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.




प्रारंभी कारखान्याचे सभासद दादासाहेब गंडाळ व सौ. अर्चना गंडाळ यांचे हस्ते गव्हाण तर ऊस पुरवठा विभागाचे मिनिनाथ ओंबळे व सौ. सुमनताई ओंबळे यांचे हस्ते ऊस वजन काट्याची विधिवत पूजा करण्यात आली.

श्री. घुले पुढे म्हणाले की, कारखान्याचे २१४ गावांचे कार्यक्षेत्र आहे. ज्ञानेश्वर कारखान्यावर शेतकऱ्यांचा विश्वास आहे. आपले ऊस वजन काटे ही पारदर्शक आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त ऊस आणणे आणि गाळप करणे हेच आपले उद्दिष्ट आहे. १३३ कोटीच्या डिस्टिलरी-इथेनॉल प्रकल्प विस्तारीकिकरण-आधुनिकीकरण व इंसनरेशन बॉयलरचे काम पूर्ण झालेले आहे. या हंगामात सिरप व बी-हेवी मोलासेस पासून २.५ कोटी लीटर इथेनॉल निर्मिती केली जाणार आहे.

माजी आ.पांडुरंग अभंग म्हणाले की, कारखान्याचे कार्यक्षेत्रात ऊस पिकांची परिस्थिती चांगली आहे. शेतकरी विभागाकडून ऊस तोडणीचे काटेकोर नियोजन केले जाणार असून मार्च अखेर सर्व ऊसाचे गाळप पूर्ण होईल, त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला सर्व ऊस 'ज्ञानेश्वर'लाच द्यावा, असे आवाहन करून केंद्र सरकारने साखरेच्या किमान विक्री दरात व इथेनॉलच्या भावात वाढ करावी अशी मागणी केली.

यावेळी तुकाराम मिसाळ, दत्तात्रय काळे, डॉ. शिवाजी शिंदे, बाळासाहेब नवले, प्रभाकर कोलते, गणेश गव्हाणे, नामदेव निकम, अशोक वायकर, बबनराव धस, रामभाऊ पाउलबुद्धे, राजेंद्र परसय्या, बबनराव भानगुडे, हुकुमबाबा नवले, दिलीपराव मोटे, काकासाहेब काळे, ज्ञानदेव दहातोंडे, जनार्दन शेळके, कचरदास गुंदेचा, उद्धव नवले, राजू परसैया, एकनाथ भुजबळ, दत्तात्रय विधाटे, बाजीराव मुंगसे, भारत साबळे, मोहनराव गायकवाड, उत्तमराव आहेर, अंबादास कळमकर, दत्तात्रय खाटीक, लक्ष्मण बनसोडे, संभाजीराव आगळे, पंढरीनाथ फुलारी, आबासाहेब ताकटे, बाबासाहेब काळे, गोरक्षनाथ घोडेचोर, भाऊसाहेब गोरे, सुधाकर गोरे, नामदेव गोरे, बाळासाहेब वाघडकर, राजेंद्र चामुटे, सोमनाथ गव्हाणे, कारखान्याचे कामगार संचालक सुखदेव फुलारी, संभाजीराव माळवदे, तांत्रिक सल्लागार एस. डी. चौधरी, एम. एस. मुरकुटे, महेंद्र पवार, चिफ इंजिनिअर राहुल पाटील, मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर, नंदकिशोर पाटील, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, बप्पासाहेब बामदळे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन भाऊसाहेब सावंत यांनी केले तर संचालक बबनराव भुसारी यांनी आभार मानले.

# मढेवडगावचा सुपुत्र संजय भोसले चित्रपट निर्मिती क्षेत्रात

## मोशन पोस्टर प्रदर्शनाने 'श्री गणेशा' चित्रपटाची घोषणा । २० डिसेंबरला होणार प्रदर्शित

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

मढेवडगाव येथील उद्योजक संजय माणिक भोसले यांनी चित्रपट निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले आहे. त्यांनी 'येड्यांची जत्रा' तसेच 'टकाटक'सारखे सुपरडुपर हिट चित्रपट बनवणारे दिग्दर्शक मिलिंद झुंबर कवडे यांना बरोबर घेत आगामी चित्रपटाची घोषणा मोशन पोस्टर प्रदर्शित करून करण्यात आली आहे. मराठी सिनेसृष्टीतील आघाडीच्या कलाकारांची मांदियाळी आणि त्यांची धमाल 'श्री गणेशा' या चित्रपटात पाहायला मिळणार असल्याचे संजय भोसले यांनी सांगीतले. २० डिसेंबरला 'श्री गणेशा' हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार असून प्रेक्षकांना कौटुंबिक मनोरंजनाची धमाल पाहायला मिळणार आहे.

श्री. भोसले यांच्या एमएच-१२ सिनेमीडियाने आऊट ऑफ द बॉक्स फिल्म्सच्या सहयोगाने प्रस्तुत केलेला 'श्री गणेशा' हा चित्रपट म्हणजे एक धमाल रोड मुव्ही आहे. हास्य-विनोद, धमाल-मस्ती, नाट्यमय घडामोडी, रोमान्स आणि इमोशन्सची रोलर कोस्टर राईड असलेल्या या चित्रपटाची निर्मिती संजय माणिक भोसले आणि कांचन संजय भोसले यांनी केली आहे. चित्रपटात प्रमूख भूमिकेत प्रसिद्ध कलाकार प्रथमेश परब, संजय नार्वेकर, शशांक शेंडे दिसणार आहेत.

'श्री गणेशा' या चित्रपटाची कथा मिलिंद कवडे यांची असून पटकथा मिलिंद यांनी संजय नवगिरे यांच्या साथीने लिहिली आहे. संवादलेखन संजय नवगिरे यांनी केलं आहे. गीतकार जय अत्रे ने लिहिलेल्या अर्थपूर्ण गीतांना सुमधूर संगीतसाज चढवण्याचं काम संगीतकार वरुण लिखते यांनी केलं आहे. पार्श्वसंगीत अभिनय जगताप यांनी दिलं असून, सिनेमॅटोग्राफी हजरत शेखवली यांनी केली आहे. तर अंकित चंदिरमाणी यांचा सनशाईन स्टुडिओज हा चित्रपट महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वितरीत करणार आहे.



### संजय भोसले यांची गगनभरारी

■ मढेवडगाव (ता. श्रीगोंदा) येथील संजय भोसले यांचा जन्म सर्वसामान्य कुटुंबात झाला. वडिल स्व. माणिकराव भोसले यांना तीन मुले रविंद्र, महेश व संजय. त्यातील संजय हा शेंडेफळ. वडिलांनी मोलमजुरी करून मुलांचे शिक्षण पूर्ण केले. संजय लहानपणापासून वेगवेगळे व्यवसाय करुन पुण्यात ट्रॅव्हल कंपन्यात स्थिरावला. नंतर त्याने स्वतःची ट्रॅव्हल कंपनी स्थापून त्यात उत्तुंग यश मिळवले. लहानपणापासून चित्रपट क्षेत्राचे कुतूहल व आवड होती. मराठी चित्रपट निर्मितीचे स्वप्न उराशी बाळगल्याने त्याने स्वतःचा एमएच १२ सिनेमिडीया बॅनर स्थापन करून नामांकित कलाकार व सिनेक्षेत्रातील नामांकित व्यक्तींना बरोबर घेत आपल्या पहिल्या वहिल्या चित्रपटाची घोषणा केल्यामुळे श्रीगोंदा तालुक्यात संजयवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## आ. आशुतोष काळेंच्या पुढाकारातून होत असलेले उपजिल्हा रुग्णालय जनतेच्या आरोग्यासाठी वरदान ठरणार : कृष्णा आढाव

● **कोपरगाव । वीरभूमी –**

मतदार संघातील जनतेला अपेक्षित असलेला सर्वांगीण विकास तर करायचाच परंतु त्याच बरोबर जनतेचे आरोग्य कसे अबाधित राहील यासाठी कोपरगाव शहरात आ.आशुतोष काळे यांच्या पुढाकारातून आकाराला येत असलेले उपजिल्हा रुग्णालय मतदार संघातील जनतेच्या आरोग्यासाठी वरदान ठरणार असल्याचे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव यांनी म्हटले आहे.

कोपरगाव शहरातील प्रभाग क्र.१३ मध्ये कोपरगाव विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार आ. आशुतोष काळे यांच्या प्रचारार्थ जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या कॉर्नर सभेत ते बोलत होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव म्हणाले की, सर्वसामान्य जनतेसाठी रस्ते, वीज, पाणी या सुविधा अत्यंत महत्वाच्या असल्यामुळे या पाच वर्षात हे मुलभूत प्रश्न मार्गी लागले आहेत त्याचबरोबर आ. आशुतोष काळे यांनी जनतेच्या आरोग्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाची वचनपूर्ती करून अत्यंत महत्वाचा प्रश्न मार्गी लावला आहे. कोपरगाव विधानसभा मतदार संघापासून अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालय जवळपास १०० किलोमीटर अंतरावर आहे. उत्तर नगर जिल्ह्यात दुसरे उपजिल्हा रुग्णालय नाही. त्यामुळे मतदार संघातील नागरिकांना गंभीर आजारावर उपचार घेण्यासाठी अहिल्यानगर येथे जाणे शक्य नाही. त्यामुळे त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक अडचणी वाढत होत्या.याची जाणीव असणाऱ्या आ.आशुतोष काळे यांनी गंभीर आजार असणाऱ्या रुग्णांना सर्वच आजारांवर वेळेत उपचार उपलब्ध व्हावे यासाठी कोपरगाव ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळविला असून त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

त्याचबरोबर मतदार संघाच्या ग्रामीण भागाचा देखील आरोग्याचा प्रश्न सोडवितांना माहेगाव देशमुखसह कोळपेवाडी, कोळगाव थडी सुरेगाव, शहाजापूर मळेगाव थडी, कुंभारी, धारणगाव, हिंगणी, मुर्शतपूर, सोनारी आदी गावातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले आहे. तसेच संवत्सर येथील ३० बेडचे ग्रामीण रुग्णालय, कर्मचारी निवासस्थान, पोहेगाव येथे ३० बेडचे ग्रामीण रुग्णालय, चासनळीच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे नूतनीकरण, तिळवणी प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी, मढी बु.प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजुरी,ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प, तसेच कोपरगाव शहरात आरोग्यवर्धिनी सेंटर उभारून नागरिकांच्या आरोग्याची काळजी दूर केली आहे. भविष्यात त्यांना मतदार संघाच्या विकास करण्यासाठी अधिकची प्रेरणा मिळावी यासाठी आ. आशुतोष काळे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव यांनी यावेळी केले.

# सौ. घोगरे यांना मिळणाऱ्या वाढत्या पाठिंब्याने सत्ताधारी धास्तावले

## लोणी मधील सभेत लाईट बंद करण्याच्या प्रचारासह गावोगावी समाजकंटकांनी फ्लेक्स फाडले

● **राहाता । वीरभूमी –**

पस्तीस वर्षे सत्ता असूनही कोणतेही विकास कामे न करता जनतेला भुलथापा देणाऱ्यांना यावेळेस जनता माफ करणार नाही. मी साधी गृहिणी असून मला मिळणारा मोठा पाठिंबा पाहून सत्ताधारी घाबरले आहे. भर सभेतील लाईट बंद करणे फ्लेक्स फाडणे अशी वाईट कृत्ये ते करत आहेत. मात्र आपली लढाई सुरूच राहील, असे प्रभावतीताई घोगरे यांनी म्हटले आहे.

लोणी बुद्रुक येथे झालेल्या सभेत त्या बोलत होत्या. यावेळी ताराचंद म्हस्के, सुधीर म्हस्के, पंकज लोंढे, उत्तमराव घोरपडे, नानासाहेब शेळके, गोकुळ डूबे आदींसह महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रभावतीताई घोगरे म्हणाल्या की, ३५ वर्षाची दहशत मोडून काढण्यासाठी मी उभी आहे. जनतेचा वाढता पाठिंबा पाहून सत्ताधारी घाबरले आहेत. माझ्या



सभांमध्ये अडचणी निर्माण करणे, भर सभेमध्ये लाईट बंद करणे, गावोगावी माझ्या प्रचाराचे लागलेले फ्लेक्स फाडणे असे दुष्कृत ते करत आहेत. यामधून त्यांची मानसिकता दिसत आहे. लाडक्या बहिणीचा डांगोरा राज्यभर पिटणाऱ्या भाजपने महिलांची अवस्था काय आहे ते शिर्डी मतदारसंघात येऊन पहावे, असे आवाहन करताना हा लढा सर्वसामान्यांसाठी आहे. जनतेचा पाठिंबा मिळत आहे. लोक दडपशाही खाली आहेत. मात्र मतदान रूपाने ते यांची दहशत मोडून काढणार आहेत. येथे लोकशाही नसून ठोकशाही आहे. बोलू दिले जात नाही. जो विरोधी बोलतो त्याचे हातपाय मोडले जात आहेत. सभा घेण्याची स्वातंत्र्य आहे. मात्र आमच्या सभा घेण्यासाठी सुद्धा अडथळे निर्माण करत आहेत. माध्यमांची मुस्कटदाबी केली आहे. पत्रकार याला वाचा फोडत नाही हे दुर्दैव आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. त्यामुळे यांनी लोकांना जेवढा त्रास दिला तेवढा लोक यांना त्रास देतील, असे सांगताना कोणीही दहशतीला घाबरू नका सर्वांनी महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कम उभे रहावे, असे आवाहन केले.

ताराचंद म्हस्के म्हणाले की, शिर्डी मतदारसंघांमध्ये लोकशाही राहिली नाही. एक साधी महिला भाजपच्या नेत्याविरुद्ध लढत आहे. त्यांना मतदारसंघातून बाहेर सुद्धा पडता येत नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे. यावेळेस परिवर्तन अटळ आहे.

सुधीर म्हस्के म्हणाले की, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने जिल्ह्यात निवडणूक लढवली जात असून सर्व राज्याचे लक्ष या मतदारसंघाकडे लागले आहे. सौ. प्रभावती घोगरे या लढवय्या असून आता कुणीही न घाबरता सर्वांनी त्यांच्या पाठीशी उभे रहावे, असे आवाहन केले.

यावेळी दिवसभरात त्यांनी आडगाव, गोगलगाव, चंद्रपूर, लोहगाव, लोणी खुर्द या ठिकाणी विविध नागरिकांशी संवाद साधला.

### आडगावात समाजकंटकांनी फ्लेक्स फाडले तर लोणीतील सभेत लाईट गायब

■ सौ.प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लावण्यात आलेले फ्लेक्स समाजकंटकांनी फाडले तर लोणी बुद्रुक येथे सभा सुरू असताना लाईट बंद करण्यात आली. तरीही मोठी गर्दी थांबून राहिल्याने सभा सुरूच होती. यामुळे दडपशाही किती आहे हे जनतेने समजून घ्यावे, असे आवाहन सौ. प्रभावतीताई घोगरे यांनी केले आहे.

SPOT NEWS

## मतदारजागृती अभियानाला राळेगण सिद्धी येथे प्रारंभ

**नगर । वीरभूमी–**

ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांनी अभियान यात्रेतील गाडयांना हिरवा झेंडा दाखवला तसेच मतदार जागृती अभियान पत्रकाचे प्रकाशन व वाटप शुभारंभ अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते झाला. जागरूक मतदार हाच लोकशाहीचा आधार आहे. भ्रष्ट, गुंड, व्यभीचारी, लुटारू यांना आपले मत नागरिकांनी देऊ नये. स्वच्छ चारित्रीशील उमेदवार ला आपले अनमोल मत द्यावे.माझं मत म्हणजे स्वातंत्र्य ज्यांनी मिळवून दिले त्यांची स्वप्नपूर्ती आहे. राज्य आणि समाज्याच माझ्या मतानी नवनिर्माण होणार असल्यामुळे हा विचार करूनच नागरिकांनी मतदान करावे असे अण्णा हजारे म्हणाले. राज्यातील नाशिक, जालना, अहिल्यानगर, नांदेड,परभणी संभाजीनगर, हिंगोली, वाशीम, लातूर, सोलापूर, सातारा, सांगली सहकोकणातील असे प्रमुख २० जिल्ह्यात मतदार जागृती अभियान सुरु झाले आहे. त्याची सुरुवात राळेगणसिद्धी व नाशिक पासून झाली असे लोक आंदोलनच्या कार्याध्यक्षा कल्पना इनामदार यांनी सांगितले. अभियानातील प्रत्येक जिल्ह्यात पत्रके वाटणे, प्रत्येक जिल्ह्यात कॉलेजवर जाऊन युवा जागृती अभियान राबविण्यात येईल. तसेच लोक आंदोलन न्यासाचे सभासदांची बैठक पार पडणार आहे आणि त्यानंतर प्रत्येक जिल्हावार बसस्थानक परिसर, आठवडे बाजार व गावागावात जाऊन मतदार जागृती अभियान सुरु करणार असल्याचे लोक आंदोलन न्यासाचे खजिनदार दत्ता आवारी यांनी सांगितले.

## माथाडी कामगारांच्या मुलांना शिक्षणांमध्ये कोणतीही अडचण भासणार नाही : घुले

**नगर । वीरभूमी–**

स्व.शंकरराव घुले माथाडी पतसंस्थेच्या वतीने जे माथाडी कामगार आहेत. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पतसंस्थेच्यावतीने अतिशय स्तुत्य असा उपक्रम राबविण्यात आला आहे. पतसंस्थेचे चेअरमन व संचालक मंडळ यांनी अतिशय नाविन्यपुर्ण उपक्रम त्यांच्या कारकिर्दीमध्ये राबवुन माथाडी कामगारांच्या मुलांना शिक्षणांमध्ये कोणतीही अडचण भासणार नाही असे पतसंस्थेने करुन दाखविले आहे, आज ज्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी जी मदत करण्यात आली. त्यातुन ते निश्चित अभ्यास करुन आपले भविष्य उज्वल करतील असे प्रतिपादन हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी केले. स्व.शंकरराव घुले माथडी कामगार सहकारी पतसंस्थेच्यावतीने माथाडी कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदतीच्या धनादेशाचे वितरण जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन रविंद्र भोसले, संजय घुले, सागर पोळ, दिगंबर सोनवणे, मधुकर केकाण, बबन सुसे, गोरक्षनाथ भोरे, अनिल लांबे, अभिषेक भोरे, मुकादम गायकवाड, तबाजी कार्ले, कौसर पठाण, अर्जुन शिंदे, असिफ कादरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सागर पोळ यांनी केले. तर आभार दिगंबर सोनवणे यांनी मानले.

## समीना पठाण यांची नियुक्ती

**नगर । वीरभूमी–**

रामवाडी येथील सामाजिक कार्यकर्त्या समीना मोसिन पठाण यांची मानवी हक्क अभियानच्या शहर जिल्हा महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळे, शहर जिल्हाध्यक्ष अशोक भोसले व शहर उपाध्यक्ष दिलीप जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पठाण यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी शहर संघटक पोपट भोसले, नितीन चव्हाण, महेश भोसले, संजय अडागळे, रणसिंग मास्तर, सलिम मिर्झा, नामदेव अडागळे, सावित्री भोसले, मनीषा लोखंडे, वर्षा चांदणे, डॅनियल भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

# संगमनेर दूध संघास खाजगी दूध संकलन केंद्रांचा दूध पुरवठा

## रणजितसिंह देशमुख । निमोण येथील कानिफनाथ व हरी ओम दूध शितकरण केंद्राचे उद्घाटन

**संगमनेर । वीरभूमी –**

पुर्वीपासूनच शेतीला पुरक म्हणून दुग्धव्यवसायाकडे बघितले जात आहे. मात्र कालांतराने दुग्धव्यवसायात स्पर्धा निर्माण झाल्याने युवकांनी सुध्दा दुग्ध व्यवसायाला प्राधान्य देत नोकऱ्यांच्या मागे न लागता शास्त्रोक्त पध्दतीने, गोठे, चाऱ्यांचे नियोजन करत दुग्धव्यवसायात क्रांती निर्माण केली. संगमनेर दूध संघाने यापुर्वी खाजगी दूध स्वीकृती न करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आजपासून खाजगी दूध संकलन केंद्रांनी संघास दूध पुरवठा करणेबाबत मागणी केल्यास त्याबाबत सकारात्मक निर्णय घेऊ, असे प्रतिपादन संगमनेर दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील निमोण येथील कानिफनाथ व हरी ओम दूध शितकरण केंद्राचे उद्घाटन संगमनेर तालुका सहकारी दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांचे शुभहस्ते व व्हा. चेअरमन राजेंद्र पाटील चकोर यांचे उपस्थितीत संपन्न झाले.



श्री. देशमुख पुढे म्हणाले की, कानिफनाथ शितकरण केंद्राचे सुमारे ५,५०० लिटर दूधाचे संकलन असून हरी ओम दूध शितकरण केंद्राचे ४,५०० लिटर दूध संकलन आहे. या दोन शितकरण केंद्राच्या माध्यमातून सुमारे ३५० दूध उत्पादक शेतकरी संघाशी जोडले गेले आहेत. या शितकरण केंद्राच्या माध्यमातूनही निमोण परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात दुग्धव्यवसायातून आर्थिक उलाढाल होत आहे. या दूध उत्पादकांचे फक्त दूधच घेतले जाणार नाही तर त्यांना इतर संस्थांप्रमाणेच सर्व सुविधा व संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. सहकारी संस्थांशी जोडल्यामुळे आपण आपली भुमिका प्रभावीपणे मांडली जाऊ शकते.

दूध उत्पादकांची काळजी संघाने घेतलेली आहे. संघाचे दूध संकलन गतवर्षीपेक्षा वाढलेले आहे. संघाची उलाढाल ५५० कोटी झाली असून तालुक्यामध्ये त्यामुळे अर्थकारण बदलले आहे. तालुक्यातील व्यापारी क्षेत्र व बाजारपेठ ही संपुर्णपणे सहकारी संस्थावर अवलंबून आहे.

संघाने दूध उत्पादकांसाठी विविध योजना सुरू केलेल्या असून त्यामध्ये मुरघासाची योजना अत्यंत प्रभावीपणे राबविली. त्यासाठी ठिकाणी प्रत्यक्षिक करून मुरघासाचे महत्व दुग्ध उत्पादकांना समजाऊन सांगितले. शेतकर्यांचे त्याचे महत्व समजल्यामुळे आज प्रत्येक घराघरात मुरघासाच्या बॅगा भरलेल्या दिसत आहे. त्याचबरोबर दूध उत्पादकांना कमी किंमतीत औषधे मिळावीत म्हणून तालुक्यात विविध ठिकाणी पशुवैद्यकिय मेडिकल सुरू केलेले आहे. दूध उत्पादकांना स्मार्टकार्ड वाटप करण्यात आलेले आहे. स्मार्टकार्डच्या माध्यमातून राजहंस उत्पादनाची संघाचे स्टॉलवर कमी किंमतीत खरेदी करता येते. तसेच संघाच्या पशुवैद्यकिय मेडिकलवर किंमतीत सुट दिली जाते. मिल्कींग मशिन, चापकटर, अनुदानीत बायोगॅसची अनुदान योजना राबविली जात आहे. संघाने सद्यस्थितीत ७५० बायोगॅसचे वाटप केलेले असून ५००० बायोगॅस वाटप करण्याचे उदिद्ष्ट ठेवले आहे. तसेच ५० लिटर क्षमतेची गाय निर्माण करण्याचे उद्दिष्ठ स्वीकारले असून त्यातूनच खर्या अर्थाने हा व्यवसाय किफायतशिर होणार आहे.

सदर कार्यक्रमास बी. आर. चकोर, ॲड. ज्ञानेश्वर सांगळे, दूध संघाचे संचालक विलासराव कवडे, संतोष मांडेकर, विक्रमराजे थोरात, भारतशेठ मुंगसे, विष्णू ढोले, रविंद्र रोहम, संजय पोकळे, प्रमोद पावसे, गोरख नवले, अनिल घुगे, साहेबराव मंडलिक, रामचंद्रबाबा मंडलिक, साहेबराव गडाख कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी यांचेसह गावातील दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तळागाळापर्यंत मोफत शिक्षण पोहोचावे हेच मौलाना आझाद यांचे स्वप्न : न्या. मुजीब शेख



**श्रीगोंदा । वीरभूमी–**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांची जयंती शिक्षण दिन म्हणून साजरी करण्यात आली यावेळी अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश मुजीब शेख उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. शेख म्हणाले की, पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद हे खऱ्या अर्थाने राष्ट्रीयत्वाचे प्रतिक होते. त्यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना अपेक्षित असणारे शिक्षण तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षण मंत्री म्हणून योगदान दिले म्हणून त्यांची जयंती शिक्षण दिन म्हणून साजरी केली जाते. सर्व महामानवांचा विचार आपण अंगीकारून एक सुजाण नागरिक बनले पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने देश प्रगतीपथावर जाऊ शकेल असा संदेश न्यायाधीश शेख यांनी दिला.

यावेळी मतदान संदर्भात जागृती पर विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. ही शपथ देत असताना 'सुजाण मतदार हाच लोकशाहीचा खरा आधार' असल्याचे प्रतिपादन विस्तार अधिकारी सिताराम भुजबळ यांनी केले.

कार्यक्रमाला केंद्रप्रमुख माणिक आढाव, ॲड. अक्षय जठार, विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, पर्यवेक्षक भाऊसाहेब गदादे, विलास लबडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख संतोष शिंदे, विलास दरेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. साहेबराव मांडे तर सचिन झगडे यांनी केले.

# निमगाव बुद्रुकच्या शाळेत दहावीत शिकणारे विद्यार्थी ४४ वर्षांनी एकत्र

## शालेय जुन्या आठवणींना दिला उजाळा

**संगमनेर । वीरभूमी –**

दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या वर्ग मित्रांनी तब्बल ४४ वर्षांनी एकत्रित येत आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला.

तालुक्यातील निमगाव बुद्रुक येथील श्री ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल व कै. पी.आर.कानवडे पाटील ज्युनियर कॉलेज या शाळेतील १९८० या वर्षातील १० वीच्या वर्गातील तब्बल ३६ विद्यार्थी ४४ वर्षांनी एकत्र आले. याच शाळेचे दहावीचे माजी विद्यार्थी आणि याच शाळेत प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झालेले प्राचार्य वसंत कानवडे यांनी हे गेट टुगेदर जुळवून आणले. त्यासाठी मधुकर कवडे, अशोक डुंबरे यांच्यासह सहकाऱ्यांनी नियोजन केले असे ३६ माजी विद्यार्थी ४४ वर्षांनी एकत्र आले होते.हा आठवणींचा सोहळा हिवरगाव पावसा परिसरातील एका हॉटेलमध्ये उत्साहात संपन्न झाला. १९८० या वर्षात दहावीच्या वर्गात शिक्षण घेतलेले हे विद्यार्थी शिक्षक, इंजिनियर, ऑफिसर तसेच सहकार क्षेत्रात, नोकरीत, आदर्श शेतकरी आणि महिला उद्योजक आहेत. आणि विशेष म्हणजे नोकरीतील सर्वच सेवानिवृत्त झालेले आहेत. आपल्या ६० वर्षांनंतरच्या सरत्या वयात उपस्थित सर्वांनीच १० वीच्या वर्गातील १६ व्या वर्षाच्या आठवणींना उजाळा दिला. अनेकांनी गाणी म्हटली,गाण्यांवर समूह डान्स केला. विनोदी किस्से सांगितले. एकमेकांच्या कुटुंबाची माहिती घेतली. असा हा गेट टुगेदर चा सोहळा तब्बल ७ तास सुरू होता. यावेळी सर्वांनी आपल्या भावना व्यक्त करताना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला.यानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



यावेळी मंदा आरोटे, हेमलता भोर, सिंधू आरोटे, विद्युलता काशीद, स्नेहलता वामन, सुभद्रा लांडगे, वसंत कानवडे, मधुकर कवडे, अशोक डुंबरे, गोरक्षनाथ कवडे, भारत गोपाळे, अण्णा कानवडे, भानुदास वाकचौरे, बाळासाहेब नवले, भास्कर गोपाळे, सूर्यभान गोपाळे, सुनील डुबे, रमेश कानवडे, सूर्यभान कानवडे, मारुती कानवडे, निवृत्ती कानवडे, तानाजी कानवडे, शिवाजी कानवडे, बाळासाहेब कानवडे, नेताजी कातोरे, भगवान कानवडे, चंद्रभान कानवडे, सदाशिव कानवडे, सयाजी कानवडे, जालिंदर कानवडे, सुभाष कानवडे, शिवनाथ कानवडे, नानासाहेब कासार, तुळशीराम खिल्लारी, शिवाजी कानवडे, संपत फरगडे, सुनील डुबे, पुंजा भागवत इत्यादी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# कोपरगाव शहरात आ.आशुतोष काळेंच्या प्रचार फेरीला प्रचंड प्रतिसाद

**कोपरगाव । वीरभूमी –**

जनतेला विकासाची जी काही आश्वासने दिली त्यापैकी बहुतांश आश्वासने पूर्ण झाली असून उर्वरित कामे पूर्णत्वाच्या मार्गावर असून पुढील काळात पूर्ण होणार आहेत. त्यामुळे मतदार संघातील ग्रामीण भागात मतदारांचा जोरदार प्रतिसाद तर मिळतच आहे त्याचबरोबर कोपरगाव शहरातील प्रत्येक प्रभागात होत असलेल्या कॉर्नर सभांना देखील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहे. एकूणच विकासाचे प्रश्न सुटल्यामुळे निवडणूक मतदारांनीच हातात घेतली असल्यामुळे पुढील विकासाच्या योजना आखण्यास सुरुवात केली असल्याचे सांगत आ. आशुतोष काळे यांनी आपल्या विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे.

सोमवार (दि.११) रोजी आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहरात प्रचार फेरी काढली यावेळी या प्रचार फेरीत महायुतीच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधतांना ते बोलत होते. यावेळी या प्रचार फेरीमध्ये महिलांची देखील संख्या लक्षणीय होती. सर्व कार्यकर्त्यांनी आ.आशुतोष काळे यांचे कटआउटस हातात घेवून त्यावर लिहिलेले 'एक नंबर', 'आमचं ठरलंय' हे घोषवाक्य नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. यावेळी आ.आशुतोष काळे म्हणाले की, सत्ताधारी पक्षाचा लोकप्रतिनिधी या नात्याने माझी विकासाची जबाबदारी पार पाडतांना मतदार संघातील जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण केली. मतदार संघातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य हि मुलभूत प्रश्न सोडवीली आहेत. या पाच वर्षात केलेल्या विकास कामांना जनतेसमोर घेवून जात आहे आणि विकासाच्या मुद्द्यावरच निवडणुकीला सामोरे जात आहे. कोपरगाव शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला आहे. कोपरगाव शहरासह मतदार संघातील रस्त्यांचा प्रश्न बहुतांशी सुटला असून भविष्यात मतदार संघात सिमेंटच्या रस्त्यांचे जाळे उभारायचे आहे. उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर असून त्या माध्यमातून आरोग्याचा प्रश्न सुटणार आहे. या पाच वर्षात जनतेला माझ्याकडून विकासाच्या ज्या काही अपेक्षा होत्या त्या अपेक्षा पूर्ण केल्यामुळे जनता समाधानी आहे त्यामुळे मतदारांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे.



तत्पूर्वी प्रचार फेरीला सुरुवात करतांना कोपरगाव शहरातील हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आदी महापुरुषांच्या स्मारकांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी रस्त्याने ठिकठिकाणी सुवासिनींनी आ.आशुतोष काळे यांचे औक्षण केले व नागरिकांनी देखील हस्तांदोलन करून त्यांना आशीर्वाद दिले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# संविधानाचा रंग बदलणारे संविधानाचे रक्षण करु शकत नाहीत

## आ. अमित गोरखे | महायुतीच्या उमेदवार मोनिका राजळे यांच्या प्रचारार्थ बोधेगाव येथे सभा

**● शेवगाव | वीरभूमी –**
मागील ७० वर्षात काँग्रेसला जे सुचलं नाही, ते भाजपने करुन दाखवले. माझ्या सारख्या मागास घटकातील सामान्य युवकाला विधान परिषदेवर संधी दिली. भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद व द्रोपदी मुर्मु यांना राष्ट्रपती केले आहे. तर लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव असलेले घर ताब्यात घेतले. ३७० सारखे कलम हटवल्यामुळे जम्मू काश्मीर मध्ये आरक्षणाचा लाभ मिळाला. काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे विदेशात जाऊन, सर्व आरक्षण रद्द करणार असल्याचे सांगत असून संविधानाचा निळा रंग बदलून लाल रंगाचे संविधान दाखवत आहेत. त्यांच्यापासून संविधानाला खरा धोका असून ते काय संविधाचे रक्षण करणार. देशात भाजपाचे भक्कम सरकार आहे. राज्यात तेच सरकार निवडुन दया म्हणजे विकासाची गंगा जनतेपर्यंत येईल असे मत आवाहन परीषदेचे आमदार अमित गोरखे यांनी बोधेगाव येथे महायुतीच्या उमेदवार मोनिका राजळे यांच्या प्रचारार्थ घेतलेल्या सभेमध्ये केले.

तालुक्यातील बोधेगाव येथे आमदार मोनिका राजळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी गुजरातचे आमदार महेश कासवाल, विवेक मिसाळ, चंद्रकांत काळोखे, दादाराव भोसले, बापूसाहेब भोसले, सुभाषराव बर्डे, बापूसाहेब पाटेकर, भीमराज सागडे, बाबा राजगुरु, अनिल वडागळे, भगवान साठे, मिनाताई कळकुंबे, सुरेश भागवत, रवी आरोळे, अस्मानराव घोरतळे, संतोष वाबळे, दिलीप विखे, शरद चाबुकस्वार, नवनाथ भवार, भाऊसाहेब पाटील, अशोक ससाणे, अशोक खिळे, संजय खेडकर, सचिन बारस्कर, भाजपचे तालुका उपाध्यक्ष कासमभाई शेख, भाजपचे युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष सचिन वारकड, संदीप देशमुख, विक्रम बारवकर, सुगंध खंडागळे, लहूराव भवर, अंबादास ढाकणे, महेश घोरतळे, सुनील राजपुत, सचिन भारस्कर, कुद्दुस पठाण, राजेंद्र डमाळे, विक्रम देशमुख, प्रा. भाऊसाहेब मुरकुटे यांच्यासह महायुती घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार अमित गोरखे पुढे बोलताना म्हणाले, मोदी सरकारच्या काळामध्ये ३७० सारखे कलम हटवून तिथे अनुसुचित जाती-जमातींना प्रतिनिधीत्व दिले आहे. आण्णाभाऊ साठे यांचे भारतातच नाही तर रशियामध्ये जाऊन स्टॅचू उभारण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. अण्णाभाऊ साठे व लुहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक व्हावे अशी सर्व मातंग समाजाची मागणी होती. आज पुण्यामध्ये ५ एकर जमिन देवून त्याठिकाणी स्मारकाचे काम झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लंडन मधील घर मिळविण्याचे व दिक्षा भुमि व चैत्यभुमी ला निधीची मोठी तरतुद करण्याचे काम भारतीय जनता पार्टी महायुतीच्या काळात झाले आहे अशा गोष्टी कॉग्रेस सरकारला कधी सुचल्यादेखील नाहीत, अण्णाभाऊ साठे रिसर्च (आर्टी) संस्थेच्या माध्यमातुन हजारो मागासवर्गीय तरुण आज लाल दिव्यांच्या गाडयामधुन फिरतांनी दिसत आहेत. रमाई योजनेच्या माध्यमातुन लाखो कुटुंबांना चांगली घरे देण्याचे काम झाले आहे. भाजपा सरकारने कुठलाही दुजाभाव केलेला नाही. या योजनेत राज्यात सर्वात जास्त १ लाख ३० हजार महिलांना शेवगाव-पाथर्डी मतदार संघात आमदार मोनिका राजळे यांच्या माध्यमातुन लाभ मिळालेला आहे तर उलट लाडकी बहिण योजना बंद करण्यासाठी कोर्टात जाणाऱ्या काँग्रेस सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले आरक्षण संपुष्टात आणण्याची भाषा सुरु केली आहे. मग डॉ. आंबेडकर यांच्या विचाराचा वारसाजपणाऱ्या समाजाने आतातरी काँग्रेस सरकारला ओळखले पाहिजे नाहीतर पुन्हा आपल्याना लोकांच्या दारामध्ये जावे लागेल त्यासाठी महायुतीला साथ दया. जनतेची काळजी घेणाऱ्या आमदार राजळे हॅटट्रिक करणार आहेत.



बोधेगाव येथे आल्यावर अनेकांशी बोललो, चर्चा केली तेव्हा समजले की, राजळे यांनी सर्व घटकांना सोबत घेऊन, मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली आहेत. लाडक्या बहिणी त्यांच्या पाठीमागे ठाम उभा असल्याने त्यांचा विजय निश्चित असल्याचे त्यांनी सांगितले. बोधेगाव येथे असलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या हस्तीं आहेत त्याठिकाणी मी व आमदार मोनिका राजळे यांच्या सहकार्यातुन मोठा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. भव्य स्मारक उभारण्याचे काम आम्ही यापुढील काळात करणार आहोत. तरी सर्व अनुसुचित जाती जमातीतील समाज बांधवांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटना जिवंत ठेवण्यासाठी महायुती सोबत राहण्याचे आव्हान त्यांनी यावेळी केले.

आमदार मोनिका राजळे यांनी बोलतांना, दहा वर्षात राजकीय, सामाजिक प्रवासात प्रत्येक गावाला काही ना काही दिले. सर्व जातीपातीचे लोक विकासाच्या प्रवाहात आले तर तालुक्याला न्याय देता येतो. सर्व समाजाला सोबत घेऊन जाण्याची लोकप्रतिनिधी जबाबदारी असते, त्याच भावनेतून आजवर काम करत आहे. म्हणुनच रस्ते, वीज आणि पाण्याचे प्रश्न आज मार्गी लागले आहेत. यापुढील काळात उदयोग धंद्यांच्या माध्यमातुन रोजगार निर्माण करावयाचा आहे. विकासाची ही गती कायम ठेवण्यासाठी आपण सर्वांनी महायुतीला मतदान करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम केसभट यांनी केले. सूत्रसंचलन सोमेश्वर शेळके यांनी केले. यावेळी आमदार गोरखे यांच्या उपस्थितीत परिसरातील अस्मानराव घोरतळे, संतोष वाबळे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

# जिल्ह्यात गौरी शुगर एक नंबरचा भाव देणार

## बाबुराव बोत्रे पाटील | हिरडगाव येथील गौरी शुगरचा गाळप हंगाम शुभारंभ

**● श्रीगोंदा | वीरभूमी–**
ओंकार गृपच्या हिरडगाव येथील गौरी शुगर साखर कारखान्याला शुध्दीकरण यंत्रणा असल्यामुळे आम्ही उत्तम दर्जाची साखर तयार करत आहोत. यावर्षीच्या गाळप हंगामात दहा लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करुन अहिल्यानगर जिल्ह्यात एक नंबरचा भाव देणार असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील यांनी हिरडगाव येथे बोलताना केले. गौरी शुगरचा सोमवार दि.११ रोजी गाळप हंगाम शुभारंभ बाबुराव बोत्रेपाटील व रेखा बोत्रेपाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील पुढे म्हणाले की आ. बबनराव पाचपुते यांनी चांगल्या भावनेने हिरडगाव फाट्यावर साखर कारखाना उभा केला होता पण अपयश आले. आजही ते कारखान्याशी संपर्क साधून करतात उसाला जास्तीत जास्त भाव दिला पाहिजे यावर चर्चा करतात. चांगले गाळप करुन शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्त भाव कामगारांना वेळेवर पगार हा गौरी शुगरचा मुख्य उद्देश आहे. गेल्या गाळप हंगामात ऊसाला ३००६ रूपयांचा प्रतिटन भाव दिला. दिवाळीला शेतकऱ्यांना ऊसाच्या प्रमाणात मोफत साखर दिली. शेतकऱ्यांनी गौरी शुगरला चांगला ऊस घालावा त्यासाठी गौरी शुगरची टीम शेतकऱ्यांना पुर्ण सहकार्य करणार आहे असेही बाबुराव बोत्रे पाटील म्हणाले.

यावेळी मिलिंद दरेकर, संतोष दरेकर, आत्माराम फराटे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाला संपतराव दरेकर, मारुती औटी, बाळासाहेब घोलप, भाऊ औटी, सचीन चौधरी, रामदास दरेकर, बाळासाहेब वाळके उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्य व्यवस्थापक रोहिदास यादव यांनी तर आभार नवनाथ देवकर यांनी मानले.

# रासपचे संगमनेर तालुकाध्यक्ष सोपान तांबडे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**● संगमनेर | वीरभूमी–**
स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस मुळे देशाचा विकास झाला आहे. राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव आणि संविधान जपणारा हा पक्ष असल्याने या पक्षाचे भवितव्य उज्वल असून काँग्रेस विधिमंडळाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष सोपानराव तांबडे यांचा आपल्या सहकाऱ्यांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. रासपाचे तालुकाध्यक्ष सोपान तांबडे यांच्यासह डिग्रस गावचे युवा नेते सोमनाथ वारे यांचा आदिवासी युवकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



यावेळी बोलताना आमदार थोरात म्हणाले की, काँग्रेस पक्षाला मोठी त्यागाची व बलिदानाची परंपरा आहे. देशाच्या विकासात काँग्रेसचे अत्यंत महत्वपूर्ण योगदान असून राज्यांमध्ये आणि देशांमध्ये ही काँग्रेस पक्ष उभारी घेत आहे. महाविकास आघाडीवर लोकांचा विश्वास वाढला आहे संविधान वाचवणारा हा पक्ष असून काँग्रेस गोरगरीब व सर्वसामान्यांच्या विकासासाठी सतत काम करणारा पक्ष आहे. या पक्षाची विचारधारा ही लोकशाहीला समर्पित आहे. काँग्रेसमध्ये तरुणांना भविष्यात मोठी संधी असल्याचे ही ते यावेळी म्हणाले.

रासपमधून एकनाथ बिडगर बाळासाहेब वावरे यांच्यासह अनेकांनी प्रवेश केला आहे. यावेळी बुवाजी बाबा पुणेकर, मारुती पुणेकर, रावसाहेब कोरडकर, दामू खेमनर, पोपटराव होळकर, रामदास तांबडे, संजय होळकर, अनिल रुपनर, सोमनाथ हलवर, किशोर होडगर, शंकर बिडगर, अशोक खरात आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# आ. बाळासाहेब थोरात हे राज्याच्या राजकारणातील दीपस्तंभ

## खा. डॉ. अमोल कोल्हे | तळेगाव दिघे येथे आमदार थोरात यांच्या प्रचारार्थ भव्य सभा

**● संगमनेर | वीरभूमी–**
जेव्हा समुद्रात वादळ तयार होते आणि जहाज भरकटायला लागते तेव्हा समोर असलेल्या दीपस्तंभ मार्गदर्शन करत असतो . याप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणात मोजकेच व्यक्तिमत्व असून आमदार बाळासाहेब थोरात हे राज्याच्या राजकारणातील दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन शिरूरचे खासदार संसदरत्न डॉ. अमोल कोल्हे यांनी केले आहे.

काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या प्रचारार्थ युवक काँग्रेस व महाविकास आघाडीच्या वतीने आयोजित युवा निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार बाळासाहेब थोरात, मा. मंत्री आमदार अमित देशमुख खासदार निलेश लंके ,खासदार भाऊसाहेब वाकचौरे ,मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, अॅड. माधवराव कानवडे, दुर्गाताई तांबे, रणजीतसिंह देशमुख, बाबासाहेब ओहोळ, बाळासाहेब गायकवाड, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, महेंद्र गोडगे, मिलिंद कानवडे, अजय फटांगरे, रामहरी कातोरे, अमर कतारी, अशोक सातपुते, संजय फड यांच्यासह महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, राज्यामध्ये आमदार आणि मंत्री सुद्धा आता विकत घेता येत आहेत. ती वाईट प्रथा निर्माण झाली आहे. महायुतीला लोकसभेमध्ये मतांची कडकी पडली म्हणून आठवली बहीण लाडकी. महायुती हे फोडाफोडी आणि पक्ष व चिन्ह चोरून आलेले सरकार आहे. ते उजळ माथ्याने महाराष्ट्रात फिरू शकत नाही. आणि त्यांना तो अधिकार नाही.

पंधरा लाख रुपये देण्याचे आश्वासन देणारे पंधराशे रुपये देत आहेत. हा सुद्धा त्यांचा चुनावी जुमला आहे. मविआ सरकार सत्तेवर आल्यास महालक्ष्मी योजनेतून शाश्वत ३००० रुपये महिना, ६ गॅस सिलेंडर मोफत व तीन लाख रुपयांची कर्जमाफी मिळणार असून सर्वांनी आमदार बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या स्वच्छ व कर्तबगार नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहत संगमनेर तालुक्यातून मतांचा विक्रम करा असे सांगताना तू किती बी ताण, येणार नाही बाण असा सूचक इशारा महायुतीला दिला.

खासदार लंके म्हणाले की, पूर्वेकडचे काही लोक संगमनेर मध्ये खेटण्यासाठी आले. इथे खरा वाघ आहे. वाघाच्या भीतीने हे घाबरून पळाले. आता त्यांना मतदारसंघाच्या बाहेर सुद्धा येता येत नाही. अहमदनगर दक्षिणमध्ये त्यांना झटका मिळाला आहे. आता राहत्या मध्ये त्यांना झटका मिळणार आहे. बहिर्जी नाईक हे निष्ठावंत होते त्यांनी कधी निष्ठा बदलली नाही मात्र संगमनेर मधील तोतया खबरीलाल याचा जनतेने कडेलोट करावा, असे आवाहन केले.

आमदार अमित देशमुख म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकारणातील स्वच्छ नेतृत्व असलेले आमदार बाळासाहेब थोरात यांनी स्वकर्तृत्वातून राज्यात



आपली व तालुक्याची ओळख निर्माण केली आहे. आगामी काळात राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेवर येणार असून यावेळी संगमनेरकरांना मोठी संधी आहे असे ते म्हणाले.

आमदार थोरात म्हणाले की, संगमनेर तालुक्यातील जनतेचे प्रेम आणि नेतृत्वाचा विश्वास याचबरोबर सतत केलेले काम हे जनतेपर्यंत घेऊन जाताना २० तारखेपर्यंत सर्वांनी चांगले नियोजन करा. संगमनेर तालुक्याबरोबरच राहता तालुक्यामध्येही आपल्याला दुरुस्ती करायची असल्याचे ते म्हणाले.

यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मा.आमदार डॉ. सुधीर तांबे यांनीही आपली मनोगत व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवक नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केले. यावेळी ओंकार बिडवे, सचिन दिघे, सुभाष सांगळे, महेंद्र गोडगे, रमेश नेहे, प्रदीप हासे, वैष्णव मुर्तडक, अशोक सातपुते, बाबासाहेब कांदळकर यांच्यासह विविध तरुणांनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी तालुक्यातील युवक, नागरिक, महिला व महाविकास आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.